भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ९३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०२/२०१७

**१) बॅक मॅनेजर सांगुन मोबाईलवर फोन करुन तोतयागीरी व ठगवणुक करुन ऑनलाईन चोरी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०१/११/२०१५ते ०५/०२/२०१७ चे ०४.३३ वा. दरम्यान. यातील फिर्यादी बाबुलाल वामन बोंद्रे वय ४४ वर्ष रा. हनुमान वार्ड वरठी चे बॅक ऑफ इंडीया शाखा वरठी येथे बचत खाते क्र. ९२०७१०१०००१५३४७ असुन दि. ०१/११/२०१५ ला त्याचे मोबाईल वर अज्ञात आरोपीने फोन करून मी बॅक मॅनेजर बोलतो अशी तोतयागीरी करून ठगवणुक करून फिर्यादी कडुन त्याचा एटीएम चा १५ आकडी क्र. सिव्हीसी क्र. व पिन क्र. क्रमांक घेवुन फिर्यादीच्या वडीलाचे क्रमांकाच्या खात्यातुन एमपीईएसए व एमएमपीएल च्या माध्यमातुन दोनदा एकुण ५९९०/–रू. ऑनलाईन चोरी करून फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४०७,४२० भादंवी. सहकलम ६६सी,६६डी टी.टी.ॲक्ट २०००.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. खंडाते पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**२) जनावराचा गोठा जाळुन दोन गाय व बैल आगीत जळाल्याने नुकसान झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/०२/२०१७ चे ००.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिचे आरोपी सोबत प्रेम संबध असुन त्यांचे प्रेमास फिर्यादीने नकार दिल्याचे कारणा वरून यातील आरोपीने फिर्यादीचे घराजवळील जनावरांचा गोठा आगीने जाळुन त्यात असलेले सामान व जनावरे २ गाई व २ बैल जळुन अंदाजे ६०,०००/रू. मालाची नुकसान केल्याने आरोपीवर संशय असल्याचे व्यक्त केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४३५ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन भांडण व शिविगाळ करुन काठीने मारहान केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. . :–**

दिंनाक ०६/०२/२०१७ रोजी १९.०० वा. दर. यातील तीनही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व फिर्यादीचे भावाशी तोंडा तोंडी भांडण करुन शिविगाळ केली व आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे उजवे डोळयाचे भुईवर काठीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी रुपेश अंकुश लोडे वय २५ वर्ष, रा. चुन्हाड यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे ३२४,५०४,५०६,३४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो. स्टे. सिहोरा हे करीत आहे.

**४) संगनमत करुन कुऱ्हाडीने दोन्ही पायावर मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिंनाक ०७/०२/२०१७ रोजी १६.०० वा. दर. यातील दोनही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीच्या मुलाने आरापीच्या मुलीला पळवुन लग्न केल्याचे कारणा वरुन भांडण करुन फिर्यादीस कुऱ्हाडीने दोन्ही पायावर मारुन जखमी केल्याने व माझ्या मुलीला आणुन दिले नाही तर तुला जिवाने मारल्या शिवाय ठेवनार नाही अशी धमकी दिली असे फिर्यादी धनपाल चंद्रभान लोणारे वय ५५ वर्ष, रा. कन्हाळगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे ३२४,५०४,५०६,३४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. राहांगडाले पो. स्टे. पवनी हे करीत आहे.

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०७/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहरनगर, कारधा, करडी, गोबरवाही, लाखणी, पवनी, व अडयाळ येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ६२ लिटर हातभट्टी दारु किंमती ३९००/–रु. व ३ लिटर ७८० मिली देशी दारु किंमती ११९० रु–/ असा एकुण किंमती ५,०९०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५९०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.